# प्रवेशासंबंधीचे नियम व महत्त्वाच्या सुचना

१) महाविद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठी माहितीपत्रकात जोडलेल्या ठराविक नमुन्यातच अर्ज केलेला असावा.

२) ठराविक नमुन्यात न केलेले, योग्य व संपूर्ण माहिती न भरलेले, दिलेल्या कालावधीनंतर कार्यालयात पोहचणारे व पुढे दिलेल्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या सत्यप्रतिलिपी न जोडलेल्या अर्जाचा विचार केल्या जाणार नाही.

**आवश्यक प्रमाणपत्रे पुढीलप्रमाणे :**

अ) शाळा/महांविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र (टी. सी.)

ब) गुणपत्रिका (मार्कलिस्ट)

क) चांगल्या वर्तणूकीचे प्रमाणपत्र (चारित्र्य प्रमाणपत्र)

ड) नोकरी करीत असल्यास सेवायोजकाचे ना हरकत प्रमाणपत्र

इ) आधार कार्ड

ई) राष्ट्रीयकृत बँकेचे बचत खाते क्रमांक

उ) अमरावती व नागपूर बोर्ड तसेच अमरावती विद्यापीठ या व्यतिरिक्त इतर बोर्ड/विद्यापीठातून येणाऱ्या विद्यार्थ्यांला मूळ निर्गमन/प्रवजन प्रमाणपत्र (Migration Certificate) १ सप्टेंबर, २०२०च्या आधी कार्यालयात जमा करावे लागेल.

३) प्रवेशास पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची यादी वेळोवेळी सुचना फलकावर लावण्यात येईल.

४) प्रवेशपात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांनी निर्धारित वेळेच्या आत आवश्यक शुल्क तसेच तसेच परिशिष्ट मध्ये दर्शविल्या प्रमाणे संबंधील शिष्यवृत्ती अर्ज कार्यालयात जमा करावे.

५) प्रवेश पत्रासोबत आवश्यक माहिती भरलेले ओळखपत्र फोटो सहित कार्यालयात सादर करावे लागेल.

६) प्रवेश पत्राला देंखील एक अद्यावत पासपोर्ट फोटो जोडणे आवश्यक राहील.

७) प्रवेशपत्राला विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जासोबत पालकांचा पत्ता असलेले दोन अंतर्देशीय पत्र/कार्ड जोडणे अनिवार्य राहील.

८) अनुसूचित जाती/जमाती/भटक्या विमुक्त जाती जमातीसाठी नियमाप्रमाणे जागा राखीव राहतील.

९) ए. टी. के. टी च्या सवलतीनुसार जर विद्यार्थ्याला महाविद्यालयात प्रवेश मिळत असेल तर ई.बी.सी. सवलतीसाठी शासनाने घेतलेल्या शुल्कासंबंधीचा निर्णय अशा विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील.

१०) डी. एड. दोन वर्षाचा अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा दोन वर्षाचा उच्च माध्यामिक व्यावसायिक अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थी बी. ए. प्रथम वर्षात प्रवेश घेण्यासाठी पात्र राहील.

११) प्रवेश देण्यासंबंधीचा अंतीम निर्णय प्राचार्य व प्रवेश समितीचा राहील.

१२) पूर्व सुचनेशिवाय विद्यार्थी वर्गात गैरहजर असल्यास प्रत्येक विषयाच्या प्रत्येक तासीकेस रु. ५ दंड आकारण्यात येईल. वर्गामध्ये ७५% उपस्थिती नसल्यास विद्यार्थ्यांला परिक्षेस बसता येणार नाही.

१३) विद्यापीठाच्या नियमानुसार प्रवेश घेण्याच्या अंतिम तारखेनंतर प्रवेश मिळणार नाही.

Scanned by CamScanner

१४) कार्यालयातून प्रसारीत होणाऱ्या सुचनांसाठी कार्यालयासमोरील सुचनाफलक अथवा ग्रंथालयातील सुचना फलक पहावा.

१५) असभ्य वर्तन करणे हा दंडनिय गुन्हा आहे.

१६) महाविद्यालयाच्या परिसरात मोबाईल व गुटखा बंदी आहे.

१७) ओळख पत्राची दुसरी प्रत प्रतिज्ञा पत्र व रु. ५० भरुनच मिळेल.

१८) कला स्नातक व वाणिज्य स्नातकच्या वर्गासाठी सराव परीक्षा अनिवार्य राहील. परीक्षा न दिल्यास प्रति पेपर रु. २० दंड आकारण्यात येईल.

१९) महाविद्यालयीन प्रवेश शासनाच्या व संबंधीत विद्यापीठाच्या वेळोवेळी निर्गमीत नियम व सुचनांच्या आधारावर होतील.

२०) स्नेहसंमेलनाबाबतचे सर्व अधिकार पूर्णतः प्राचार्यांकडे राहतील.

Scanned by CamScanner